## निशाणी कमांक २६ वरील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा दावा हा मौजे शिराढोण, ता. कळंब येथील शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/ब क्षेत्र ६ एकर १९ आर या मिळकतीची मालकी घोषीत होवून मिळण्यासाठी व निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. ४ यांनी हजर होवुन निशाणी क्र. २२ कडे त्यांची लेखी कैफियत दिली आहे. सदर प्रतिवादीने त्यांच्या कैफियतीमध्ये वादीविरूध्द प्रतिदाव्याची उभारणी केली आहे. सदर प्रतिदाव्यामध्ये त्यांनी मौजे शिराढोण, ता. कळंब येथील शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/अ एकुण क्षेत्र ९ एकर १९ आर पैकी क्षेत्र ४ एकर २ आर या मिळकतीबाबत वादीच्या विरूध्द निरंतर मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

२. प्रतिवादी क्र. ४ यांनी त्यांच्या निशाणी क्र. २२ कडील कैफियतीमध्ये उभारलेल्या प्रतिदाव्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र. २६) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ३९ नियम १ (अ) व (क) प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला असुन त्याद्वारे त्यांनी अशी मागणी केली आहे की, मौजे शिराढोण, ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथील शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/अ एकुण क्षेत्र ०९ एकर १९ आर पैकी क्षेत्र ४ एकर २ आर (म्हणजेच प्रतिवादी क्र. ४ यांनी दिनांक ०२.०१.१९९६ रोजी मदन देशमुख यांच्याकडुन सर्व्हे क्र. २९२/अ मधील खरेदी घेतलेले क्षेत्र २ एकर २ आर + त्यांनी दिनांक २७.०१.२००९ रोजी सदाशिव देशमुख यांच्याकडुन सर्व्हे क्र. २९२/अ मधील खरेदी घेतलेले क्षेत्र २ एकर). विशेषत: प्रस्तुत अर्जाच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये वर्णन केलेल्या त्यांच्या मालकीच्या व कब्जे-वहिवाटीच्या मिळकतीस वादीने दाव्याचा व प्रतिदाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत हरकत- अडथळ करू नये. (यापुढे सदर मिळकतीस 'वादग्रस्त मिळकत' असे संक्षिप्तपणे संबोधले आहे).

<u>प्रतिवादी क्र. ४ यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे</u> :-

**३.** वादग्रस्त मिळकत ही प्रतिवादी क्र. ४ यांनी मदन गेना देशमुख व सदाशिव गेना देशमुख यांच्याकडुन नोंदणीकृत खरेदीखतांच्या आधारे खरेदी घेतली आहे. सदर खरेदीखतांच्या आधारे फेरफार क्र. ६३३२ व ४२६१ हे मंजुर झालेले आहेत. वादग्रस्त मिळकतीशी वादीचा काहीही हक्क-हितसंबंध नाही. प्रतिवादी क्र. ४ यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादग्रस्त मिळकत त्यांच्या कब्जे-वहिवाटीस आहेत. तरीही, दिनांक १३.०९.२०१६ रोजी वादीने त्यांच्या वादग्रस्त मिळकतीवरील कब्जे-वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केला. म्हणुन, प्रतिवादी क्र. ४ यांना प्रतिदावा दाखल करणे भाग पडले आहे. दाव्याचा व प्रतिदाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**४.** प्रतिवादी क्र. ४ यांच्या कथनानुसार, त्यांना प्रथमदर्शनी बाजु आहे व न्यायाचा समतोल देखील त्यांच्याच बाजुने आहे. प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होईल असे त्यांनी कथन केले आहे. अशाप्रकारे, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**५.** प्रस्तुत अर्जास वादीने त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र. ५० कडे दाखल केले आहे. त्यांच्या कथनानुसार, शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ९ एकर १९ आर नसुन ते ६ एकर १९ आर आहे. वादीच्या मते, शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/अ क्षेत्र ६ एकर १९ आर व तसेच मौजे शिराढोण येथील शेतजमीनी, नामे- सर्व्हे क्र. २९३/ब, २९८/ड, २९९/ड व ३००/ड या मिळकतींची मुळ मालक गिताबाई ओमने ही होती. तिने तिच्या वर नमुद मिळकती दिनांक ३०.०९.१९५८ रोजी तुकाराम देशमुख, शिवराम देशमुख व गेना देशमुख यांना नोंदणीकृत खरेदीखताने विक्री केल्या. सदर खरेदीखताच्या आधारे सन १९६५ मध्ये फेरफार क्र. ६४ मंजुर झाला.

**६**. वादीच्या कथनानुसार, गेना देशमुख यांना सर्व्हे क्र. २९२/अ मध्ये १/३ हिश्याप्रमाणे २ एकर ६ आर एवढे क्षेत्र येत होते. तरीही, त्यांनी बेकायदेशिरपणे त्यांच्या हिश्यापेक्षा जास्त क्षेत्र म्हणजेच सर्व्हे क्र. २९२/अ मधील ३ एकर ६ आर एवढे क्षेत्र प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वडील आणि प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे आजोबा भगवान राठोड यांच्या हक्कात दिनांक ०२.०५.१९७५ रोजी खरेदीखताने विक्री केले. वादीने पुढे असे कथन केले आहे की, वास्तविक पाहता गेना देशमुख यांच्या मृत्युनंतर त्यांची मुले नामे मदन व सदाशिव यांना सर्व्हे क्र. २९२/अ मध्ये कोणतेही क्षेत्र शिल्लक राहीले नसताना देखील सदर मदन व सदाशिव यांनी प्रतिवादी क्र. ४ यांच्या हक्कात वादग्रस्त मिळकतीची बेकायदेशिर खरेदीखते करून दिली. वादीच्या कथनानुसार, सदर खरेदीखतांच्या आधारे मंजुर झालेले फेरफार चुकीचे आहेत. अशा प्रकारे, वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. ४ यांची वादग्रस्त मिळकतीवर कब्जे-वहिवाट नाही.

**७.** वादीने पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ यांच्या बाजुने प्रथमदर्शनी स्थिती नाही व तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजुने नाही. प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास सदर प्रतिवादींपेक्षा त्यांनाच जास्त नुकसान होईल असे वादीचे म्हणणे आहे. शेवटी, वादीने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**८.** दोन्ही पक्षांच्या परस्पर कथनांच्या आधारे खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित झाले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष खालील कारणांसह दिलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. ४ हे सिध्द करतात काय की, त्यांच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण आहे ? | : | नकारार्थी |
| २ | प्रतिवादी क्र. ४ हे सिध्द करतात काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने आहे ? | : | नकारार्थी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | प्रस्तुतचा अर्ज मंजुर झाल्यास कोणाचे अपरिमीत नुकसान होईल ? | : | वादीचे |
| ४ | आदेश काय? | | .अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

## का र णे मि मां सा

**९.** मी प्रतिवादी क्र. ४ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री.आर.जी.अंधारे व वादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.पवार यांचा युक्तीवाद श्रवण केला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

**मुद्दा क्र. १ बाबत :**

**१०.** प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रस्तुतच्या अर्जाच्या पुष्टयर्थ निशाणी क्रमांक २७ कडे त्यांचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यांच्या कथनानुसार, वादग्रस्त मिळकत ही त्यांनी मदन देशमुख व सदाशिव देशमुख यांच्याकडुन दोन वेगवेगळया नोंदणीकृत खरेदीखतांच्या आधारे खरेदी घेतली आहे. तसेच, सदर खरेदीखतांच्या आधारे फेरफार क्र. ६३३२ व ४२६१ मंजुर झालेले आहेत. प्रतिवादी क्र. ४ यांच्या मते वादग्रस्त मिळकतीशी वादीचा काहीही हक्क-हितसंबंध नाही. तरीही, दिनांक १३.०९.२०१६ रोजी वादीने वादग्रस्त मिळकतीवरील त्यांच्या कब्जे-वहिवाटीस हरकत अडथळा केला. म्हणुन, प्रतिवादी क्र.४ यांच्या मते त्यांना प्रथम दर्शनी प्रकरण आहे.

**११.** याउलट, वादीने असे कथन केले आहे की, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ९ एकर १९ आर नसुन ते ६ एकर १९ आर आहे. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सर्व्हे क्र. २९२/अ क्षेत्र ६ एकर १९ आर ही मिळकत गिताबाई ओमने हिच्या मालकीची होती. दिनांक ३०.०९.१९५८ रोजी सदर गिताबाई हिने सर्व्हे क्र. २९२/अ ही मिळकत व तिच्या मौजे शिराढोण येथील इतर काही शेतजमीनी तुकाराम देखमुख, शिवराम देशमुख व गेना देशमुख यांना खरेदीखताने विक्री केल्या. वादीने पुढे असे

कथन केले आहे की, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीमध्ये १/३ हिश्याप्रमाणे गेना देखमुख हे २ एकर ६ आर क्षेत्राचे मालक होते. तरीही, त्यांनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील त्यांच्या हिश्यापेक्षा जास्त क्षेत्राचे म्हणजेच ३ एकर ६ आर या मिळकतीचे बेकायदेशिरपणे प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वडील आणि प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे आजोबा भगवान राठोड यांच्या हक्कात दिनांक ०२.०५.१९७५ रोजी खरेदीखत करून दिले. वादीने पुढे असे कथन केले आहे की, गेना देशमुख यांच्या मृत्युनंतर सर्व्हे क्र. २९२/अ मध्ये त्यांच्या नावे कोणतेही क्षेत्र शिल्लक राहीलेले नसताना देखील त्यांची मुले नामे मदन व सदाशिव यांनी बेकायदेशिरपणे वादग्रस्त मिळकतीची खरेदीखते प्रतिवादी क्र. ४ यांच्या हक्कात करून दिली आहेत. वादीच्या मते, वादग्रस्त मिळकत ही प्रतिवादी क्र. ४ यांच्या कब्जे-वहिवाटीस नसल्यामुळे सदर प्रतिवादीच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण नाही.

**१२.** प्रतिवादी क्र. ४ यांनी अभिलेखावरती वादग्रस्त मिळकतीच्या संदर्भातील खरेदीखतांच्या छायांकित प्रती दाखल केल्या आहेत. तसेच, त्यांनी सदर खरेदीखतांवरून मंजुर झालेल्या फेरफार क्रमांक ६३३२ व ४२६१ च्या साक्षांकित प्रती अनुक्रमे निशाणी क्र. ३४ व ३५ कडे दाखल केल्या आहेत. याउलट, वादीने अभिलेखावर दिनांक ३०.०९.१९५८ रोजीच्या खरेदीखताची साक्षांकित प्रत निशाणी क्र. ५७ कडे दाखल केली आहे. सदर खरेदीखताच्या आधारे मंजुर झालेल्या फेरफार क्र. ६४ ची साक्षांकित प्रत वादीने निशाणी क्र. ५८ कडे दाखल केली आहे. याशिवाय, वादीने सर्व्हे क्र.२९२/अ या मिळकतीच्या खासरा-पाहणी पत्रकाची साक्षांकित प्रत निशाणी क्र. ५४ कडे दाखल केली आहे. मी, वर नमुद कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले.

**१३.** निशाणी क्र. ५७ कडील दिनांक ३०.०९.१९५८ रोजीच्या खरेदीखताचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ६ एकर १९ आर आहे. सदर खरेदीखतानंतर सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ९ एकर १९ आर कसे झाले ?, याबाबत प्रतिवादी क्र. ४ यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा

अभिलेखावर दाखल केलेला नाही. निशाणी क्र. ५७ कडील खरेदीखताचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दिनांक ३०.०९.१९५८ रोजी सर्व्हे क्र. २९२/अ क्षेत्र ६ एकर १९ आर व इतर काही शेतजमीन गिताबाई ओमने हिने तुकाराम देशमुख, शिवराम देशमुख व गेना देशमुख यांना विक्री केले होते. त्यामुळे, मयत गेना हे १/३ हिश्याप्रमाणे सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र २ एकर ६ आर या मिळकतीचे मालक होते. अशा परिस्थितीत, मयत गेना यांनी भगवान राठोड यांच्या हक्कात सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ३ एकर ६ आर या मिळकतीचे खरेदीखत कसे करून दिले ?, याचा उलगडा होत नाही. याउपरही, गेना देशमुख यांच्या मृत्युनंतर त्यांच्या नावे सर्व्हे क्र. २९२/अ मध्ये कोणतेही क्षेत्र शिल्लक नसताना देखील त्यांची मुले नामे मदन व सदाशिव यांनी वादग्रस्त मिळकतीच्या संदर्भाने प्रतिवादी क्र. ४ यांच्या हक्कात दोन वेगवेगळी खरेदीखते कशी करून दिली ?, याचा खुलासा प्रतिवादी क्र. ४ यांनी केलेला दिसुन येत नाही.

**१४**. अभिलेखाचे अवलोकन केले असता पुढे असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी व तसेच प्रतिवादी क्र. ३ यांनी देखील निशाणी क्र. २२ कडील कैफियतीमध्ये प्रतिदावे उभारलेले आहेत. प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या प्रतिदाव्यातील कथनानुसार, त्यांनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ३ एकर ६ आर ही मिळकत खरेदी घेतली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ यांच्या प्रतिदाव्यातील कथनानुसार, त्यांनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ४ एकर ७ आर ही मिळकत गुणवंत पवार यांच्याकडुन खरेदी घेतली आहे. एकंदरीत, सर्व प्रतिवादींची कथने एकत्रीतपणे विचारात घेतली तर त्यांनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ११ एकर १५ आर खरेदी केल्याचे दिसुन येते. प्रतिवादींच्याच कथनानुसार, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे एकुण क्षेत्र ९ एकर १९ आर आहे.

**१५**. यापुर्वीच, मी नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ यांनी सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ६ एकर १९ आर वरून ९ एकर १९ आर कसे झाले?,

याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच, सर्व प्रतिवादींनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील खरेदी केलेल्या क्षेत्रांची बेरीज ही ९ एकर १९ आर पेक्षाही जास्त येते. गेना देशमुख यांनी भगवान राठोड यांच्या हक्कात करून दिलेले खरेदीखतानंतर त्यांना सर्व्हे क्र. २९२/अ मध्ये क्षेत्र ४ एकर २ आर शिल्लक राहत होते, हे दाखवण्यासाठी प्रतिवादी क्र. ४ यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, वादग्रस्त मिळकतीच्या संदर्भातील खरेदीखते ही संशयास्पद वाटतात. कारण, गेना देशमुख यांनी भगवान राठोड यांच्या हक्कात करून दिलेल्या खरेदीखतानंतर त्यांच्या नावे सर्व्हे क्र. २९२/अ मध्ये कोणतेही क्षेत्र शिल्लक राहत नव्हते असे दिसुन येते. पुढे, मला असे नमुद करावेसे वाटते की, दिनांक ३०.०९.१९५८ रोजीच्या खरेदीखतामध्ये सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ६ एकर १९ आर दर्शविले आहे, तर सदर मिळकतीचे क्षेत्र वादग्रस्त मिळकतीच्या खरेदीखतामध्ये ९ एकर १९ आर दर्शविले आहे. तसेच, निशाणी क्र. ५४ कडील सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीच्या खासरा-पाहणी पत्रकाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ९ एकर १९ आर नसुन ६ एकर १९ आर आहे.

**१६**. मला याठिकाणी असे नमुद करावेसे वाटते की, जरी वादग्रस्त मिळकतीची खरेदीखते ही अद्यापपावेतो कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्दबातल ठरवली नसली तरीही सदर खरेदीखते ही संशयास्पद वाटतात. कारण, गेना देशमुख यांनी भगवान राठोड यांच्या हक्कात करून दिलेल्या खरेदीखतानंतर त्यांच्या नावे सर्व्हे क्र. २९२/अ मध्ये कोणतेही क्षेत्र शिल्लक राहत नव्हते. याशिवाय, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीच्या मुळ क्षेत्रात वाढ कशी झाली ?, याबाबत प्रतिवादी क्र. ४ यांनी खुलासा केलेला नाही. अशा परिस्थितीत, माझ्या मते, प्रतिवादी क्र. ४ यांच्याबाजुने प्रथमदर्शनी प्रकरण आहे असे कदापि म्हणता येणार नाही. तसेच, सदर प्रतिवादी हे स्वच्छ हाताने न्यायालयात आल्याचे दिसुन येत नाही. परिणामी, मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ व ३ बाबत</u>** :-

**१७.** मुद्दा क्र. २ व ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांना एकत्रीतपणे चर्चेला घेतले आहे. प्रतिवादी क्र. ४ यांच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण नसल्यामुळे न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजुने नसल्याबाबत गृहीत धरणे योग्य आहे. म्हणुन, न्यायाचा समतोल हा प्रतिवादी क्र. ४ यांच्या बाजुने असल्याची बाब सदर प्रतिवादीने सिध्द केली नाही हे स्पष्ट होते. म्हणुन, मी मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादीचेच अपरिमीत असे नुकसान होणार आहे. कारण, प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी क्र. ४ यांच्याकडुन वादीच्या कब्जे-वहिवाटीच्या दावा मिळकतीवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष मी त्या अनुषंगाने नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>** :-

**१८.** मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्ष प्राप्तीनुसार प्रस्तुतचा अर्ज हा नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. निशाणी क्र. २६ कडील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाच्या खर्चाचा विचार अंतिम खर्चाच्या तपशिलावेळी करण्यात यावा.

कळंब.
दिनांक : ०२-०२-२०१७.

स्वाक्षरीत/-
( एस.एस.उबाळे )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळंब.